मंगळवार दि.२७ ऑगस्ट२०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : ३५७
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

# दैनिक लोकनेता

बीड
जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ
मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 www. lokneta.com

## विधानसभा निवडणुकीचा प्रचार मुख्यमंत्री शिंदेंच्या नेतृत्वातच

# तर मुख्यमंत्री पदाबाबदचा निर्णय निवडणुकीनंतर-अशोक चव्हाण

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

नांदेड (वृत्तसंस्था)

आगामी विधानसभा निवडणुकीचा प्रचार महायुती सरकार हे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालीच करणार असल्याचा दावा माजी मुख्यमंत्री तथा भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते खासदार अशोक चव्हाण यांनी केला आहे. निवडणुकीच्या निकालानंतर पुढचा मुख्यमंत्री कोण? हे महायुतीमधील सर्व पक्ष एकत्रित ठरवतील, असे देखील ते म्हणाले. विधानसभेला कोणाला किती जागा मिळतील हे पूर्णपणे तेथील प्ररिस्थितीवर अवलंबन आहे. जिथे ज्या पक्षाची जिंकण्याची शक्यता आहे, तिथे त्या पक्षाला जागा दिली पाहिजे. असे देखील अशोक चव्हाण यांनी म्हटले आहे.

मुख्यमंत्री पदाच्या चेहऱ्यावर महाविकास आघाडीमध्ये रस्सीखेच सुरू असल्याचे राज्यात दिसून येत आहे. उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री पदाचे नाव घोषित करावे, अशी मागणी केली आहे. तर दुसरीकडे शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि काँग्रेस पक्षाने त्यांची ही मागणी फेटाळली आहे. त्यातच आता महायुतीमध्ये देखील पुढील मुख्यमंत्री कोण? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. यावर चव्हाण यांनी देखील असेच उत्तर दिले. याबाबतचा निर्णय निवडणुकीचा निकाल लागण्यानंतर घेतला जाईल, असे चव्हाण यांनी म्हटले आहे.

अशोक चव्हाण यांनी मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर देखील प्रतिक्रिया दिली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सरकारच्या कार्यकाळातच मराठा आरक्षणाच्या प्रक्रियेला वेग आला असल्याचा दावा चव्हाण यांनी केला आहे. दहा टक्के आरक्षणाचा देखील जनतेला फायदा झाला असल्याचे अशोक चव्हा यांनी म्हटले आहे. मराठा आरक्षणासंदर्भात सर्वपक्षीय नेत्यांची बैठक बोलण्यात येते. मात्र, त्या बैठकीला शरद पवार आणि उद्धव ठाकरे गटाचे नेते उपस्थित राहत नाही, असा आरोप देखील त्यांनी केला. मराठा आरक्षणाचा प्रश्न हा राजकीय नाही तर सामाजिक प्रश्न असल्याचा देखील ते म्हणाले.



## डॉ.गोपाल बछिरे यांची संपूर्ण बुलढाणा जिल्हा संघटक पदी निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

लोणार । विनायक कुटे

डॉ. गोपाल बछिरे यांची संपूर्ण बुलढाणा जिल्हा संघटक पदी पुनर निवडीचे आदेश सामना वर्तमानपत्राच्या माध्यमाने शिवसेना पक्षप्रमुख उद्धव साहेब ठाकरे यांनी जाहीर केले आहे

मुंबई येथे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षप्रमुख यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या विशेष बैठकीत महाराष्ट्रातील महत्त्वाच्या पद नियुक्ती संदर्भात चर्चा झाली त्या चर्चेत बुलढाणा जिल्हा संपर्कप्रमुख प्रा. नरेंद्रभाऊ खेडेकर व जिल्हाप्रमुख जालिंदरभाऊ बुधवत यांनी डॉ. गोपाल बछिरे या अगोदर घाटावरील सहा तालुक्याचे जिल्हा संघटक होते त्यांच्या संघटन कौशल्य व संघटन बांधणी संदर्भात कल्पक दृष्टिकोनाचा विचार करून त्यांचा पदभार वाढवून त्यांच्यावर संघटन बांधणी व वृध्दी या दृष्टिकोनातून संपूर्ण बुलढाणा जिल्ह्यातील तेरा तालुक्यांची जबाबदारी सोपवण्यात यावी अशी मागणी केली व पक्षप्रमुख उद्धव साहेब ठाकरे यांनी त्या मागणीस मान्यता देऊन सामना वृत्तपत्राच्या माध्यमातून जाहीर करून डॉ. गोपाल बछिरे यांच्यावर संपूर्ण बुलढाणा जिल्ह्याचे जिल्हा संघटक म्हणून जबाबदारी सोपवण्यात आली या निवडीबद्दल जिल्हा संपर्क प्रमुख नरेंद्र भाऊ खेडेकर, जिल्हा संपर्कप्रमुख छगनदादा मेहेत्रे, दत्ताभाऊ पाटील, जिल्हाप्रमुख जालिंदर भाऊ बुधवत, वसंतभाऊ भोजने, उपजिल्हाप्रमुख आशिषभाऊ रहाटे, बद्रीभाऊ बोडखे, कपिलभाऊ खेडेकर, सुनीलभाऊ घाटे, तुकाराम काळबांडे, अविनाश दळवी, संजयसिंग जाधव, युवा सेना जिल्हाप्रमुख नंदूभाऊ कराडे, महिला जिल्हा संघटिका विजया खडसन, चंदाताई बढे, संजीवनी वाघ, पार्वती ताई सुटे तालुकाप्रमुख, लखनभाऊ गाडेकर, लिंबाजी पांडव, महेंद्र पाटील, दादाराव खाडे, श्रीकृष्ण धोंडगे, श्रीराम खेळदार, हर्षल आखरे, रवींद्र साळोकार, गजानन वाघ, ईश्वर पांडव, दीपक चांभारे पाटील, शहर प्रमुख गजानन जाधव, किशोर गारोळे, परमेश्वर दहातोंडे, श्रीकांत नागरे, जीवन घायाळ, सिद्धेश्वर आंधळे, एड. आकाश घोडे, ऋषी जगताप, श्रीकांत मादनकर, बंडूभाऊ जोगदंड, लूकमान कुरेशी, सुदन अंभोरे, तानाजी मापारी, गोपाल मापारी, तानाजी अंभोरे, राजूभाऊ बुधवत, लालूभाई मुल्लाजी, रमेशभाऊ भानापुरे यांच्यासह संपूर्ण जिल्ह्यातून शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिकांकडून डॉ. बछिरे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



## धोलवड ग्रामविकास ट्रस्टच्या अध्यक्ष पदी ॲड.कुलदीप नलावडे तर सचिव पदी योगेश नलावडे यांची निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

जुन्नर । मयूर ढोबळे

जुन्नर तालुक्यातील आदर्श गाव असणाऱ्या धोलवड ग्रामविकास ट्रस्टची पंचवार्षिक अध्यक्ष पदाची निवडणूक अटीतटीसह खेळीमेळीच्या वातावरणात मोठ्या उत्साहात संपन्न झाली.सदर अध्यक्ष पदासाठी झालेल्या निवडणुकीत १८ सदस्यांपैकी अध्यक्ष पदासाठी ड.कुलदीप नलावडे व बाळासाहेब मुंढे यांनी अर्ज दाखल केला. यात गुप्त मतदान पद्धतीने चिठ्ठीद्वारे झालेल्या मतदान प्रक्रियेमध्ये १८ पैकी १० मते अध्यक्ष पदाचे उमेदवार ड.कुलदीप नलावडे यांना पडली तर बाळासाहेब मुंढे यांना ८ मते पडली. त्यामुळे बहुमताने अध्यक्षपदी ड.कुलदीप शरद नलावडे यांची निवड झाल्याचे माजी अध्यक्ष अशोक मुंढे व सचिव दत्तात्रय भागवत यांनी जाहीर केले. तर यावेळी नवनियुक्त अध्यक्ष ड.कुलदीप नलावडे यांनी सचिवपदी सर्वानुमते योगेश ज्ञानेश्वर नलावडे यांची निवड जाहीर केली. या निमित्ताने उपस्थित पदाधिकारी व सदस्य यांच्यावतीने नवनियुक्त अध्यक्ष व सचिव यांचा सत्कार करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच नवनियुक्त अध्यक्षांच्या मार्गदर्शनाखाली निवड झालेल्या भाऊबंद मंडळी सभासदांची मीटिंग घेऊन पुढील पदाधिकारी निवड करण्याचे सर्वानुमते ठरले.यानिमित्ताने धोलवड ग्रामविकास ट्रस्टचे अध्यक्ष अशोक मुंढे, सचिव दत्तात्रय भागवत, यांसह नवनियुक्त अध्यक्ष ड.कुलदीप नलावडे, सचिव योगेश नलावडे, यांसह गावातील भाऊबंद मंडळीतून ट्रस्टवर नियुक्त झालेले सदस्य राहुल नलावडे, अजित नलावडे, विनायक नलावडे, शिवाजी नलावडे, अजित नलावडे, प्रदीप नलावडे, प्रवीण नलावडे, सुनील नलावडे, बाळासाहेब मुंढे, सुभाष मुंढे, गणेश नलावडे, मच्छिंद्र दिघे, आशिष कालेकर, संदीप भोर, प्रज्वल भालेराव, अक्षय लवांडे यांसह ग्रामस्थ सतीश नलावडे, रमेश पाटील नलावडे, पत्रकार अशफाक पटेल, राजू लांडगे, अमोल नलावडे, सचिन मुंढे, संदीप मुंढे, प्रकाश नलावडे, विकास नलावडे, पंकज नलावडे, मंगेश नलावडे, अजय नलावडे, स्वप्निल लांडगे, संदीप लवांडे, सतीश लवांडे, गणेश दिघे, तेजस नलावडे, गावातील आजी माजी पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.



## हिंगोली विधानसभेचे आ.तानाजीराव मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक तरुणांनी घेतला भाजपमध्ये प्रवेश





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

सेनगाव । महादेव हरण

हिंगोली विधानसभेचे आमदार तानाजीराव मुटकुळे यांच्या अध्यक्षतेखाली आज सेनगाव येथे देशमुख यांच्यासह अनेक तरुणांनी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला सेनगाव येथील रहिवासी असलेले विकी देशमुख व विकी भैया मित्र मंडळ यांच्या मंडळातील सर्व सदस्यांनी आज सेनगाव येथे भाजपा आमदार तानाजीराव मुटकुळे यांच्या नेतृत्वाखाली जाहीर प्रवेश केला यावेळी उपस्थित केके शिंदे, आप्पासाहेब देशमुख, सतीश राव खाडे, श्रीराम देशमुख, अमोल भैया तिडके, अंकुश तिडके, अशोकराव ठेंगल, गजानन उफाड, श्रीरंग राठोड, यांच्यासह भाजप कार्यकर्ते उपस्थित होते आज विकी देशमुख यांचा भाजपमध्ये प्रवेश झाल्याने सेनगाव शहरांमध्ये येणाऱ्या विधानसभेला मोठा फायदा होणार असून विकी देशमुख यांच्यासह अनेक कार्यकर्ते कामाला लागल्याचे देखील पाहायला मिळाले.

## शाळा महाविद्यालय कोचिंग क्लास बसस्टॅन्ड परिसरात विनाकारण फिरणाऱ्या टवाळखोरांची किमया केली जाणार नाही-पोलीस नि.रोकडे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

धर्माबाद । साहेबराव दुगाने

संकल्प फाऊंडेशनचे सचिव शिवराज पाटील गाडीवान तसेच सदस्य अशोक पाटील वडजे यांनी शहरातील विविध शाळेत सिसी टीव्ही कॅमेरे बसवण्यात यावे,जेणेकरून भविष्यात काही अनुचित प्रकार घडू नये ह्यासाठी पोलीस निरीक्षक यांना निवेदन दिले होते, त्या अनुषंगाने दि २३ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता धर्माबाद पोलीस स्टेशन येथे भविष्यात कुठलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी गट विकास अधिकारी तोटेवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत शहरातील विविध शाळा महाविद्यालय व खाजगी क्लासेस यांचे मुख्याध्यापक व प्राचार्य तसेच संकल्प फाऊंडेशन सचिव गाडीवान पाटील वडजे पाटील यांची बैठक घेण्यात आली होती, यावेळी विद्यार्थ्यांशी निगडित असणाऱ्या बाबीवर प्रामुख्याने चर्चा झाली होती, त्यामध्ये एक विषय अशी होता, ज्यावर फक्त अंकुश लावण्याचे काम फक्त पोलीस प्रशासनच करू शकते, ते म्हणजे शाळा महाविद्यालय बसस्टॅन्ड येथे विनाकारण अनेक टवाळखोर मुले ही वारंवार फिरत असतात, नेमकी हीच बाब ध्यानी ठेवत पोलीस निरीक्षक रोकडे यांनी टवाळखोरांची गय केली जाणार नाही असा इशारा दिले आहेत.धर्माबाद तालुका हा तेलंगाणा राज्य सिमेवर वसलेला असून ग्रामीण भागातील अनेक शालेय व महाविद्यालयीन मुली शिक्षणासाठी दररोज धर्माबाद शहरात येजा करत असतात, शाळा व महाविद्यालय, खाजगी कोचिंग क्लासेस सुरु व संपायच्या वेळेत ही टवाळखोर मुले विनाकारण बापाने घेऊन दिलेल्या गाडीवर तिघे तिघे बसून पायी जाणाऱ्या मुलींसमोर शाईन मारणे, विनाकारण हॉर्न वाजवणे, उगाचच मुलीच्या बाजूने गाडीची कट मारणे असे उद्योग करत असल्याची बाब नित्यनेमाचीच झाली आहे. अनेकदा काही मुली त्रास सहन करण्यात धन्यता मानत असून घरी सांगावं तर शिक्षण बंद होते, त्यामुळे शांतपणे राहणेच पसंत करत आहेत.हल्ली टवाळखोरामुळे राज्यात अनेक घटना घडत असल्याचे चित्र स्पष्टपणे दिसत असून भविष्यात धर्माबादला अशी घटना घडू नये म्हणून धर्माबाद पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक रोकडे यांनी पालकांना आवाहन केले असून ज्यांची मुले शाळा कॉलेजमध्ये ऍडमिशन नसताना देखील दिवसभर उन्हाडक्या करत फिरत असून त्यांनी आपल्या पाल्याची आवश्यक ती चौकशी करून घरीच योग्य तो प्रतिबंध घालावा अन्यथा उन्हाडक्या करणारी टवाळखोर मुले शाळा महाविद्यालय कोचिंग क्लास, बसस्टॅन्ड परिसरात विनाकारण आढळून आल्यास त्यांच्या पाल्यासह पालकांची देखील गय केली जाणार नाही असा इशारा पोलीस निरीक्षक बाळासाहेब रोकडे यांनी दिला आहेत.



## झाडे लावा झाडे जगवा

### चारोळी

सारखाच तू बरसतो आहेस
उसंत घेणंच विसरतो आहेस
कधी उन्हात श्रावणधारा याव्यात
पण तूच सर्वत्र पसरतो आहेस.

रंजना सानप
मायणी (सातारा)

## वाटलुज ग्रामपंचायतीच्या उपसरपंच पदी ज्ञानदेव झिटे यांची बिनविरोध निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

दौंड । बबनराव धायतोंडे

दौंड तालुक्यातील वाटलूज ग्रामपंचायतीच्या उपसरपंच पदी ज्ञानदेव झिटे यांची बिनविरोध निवड करण्यात आल्याची घोषणा सभेचे अध्यक्ष तथा सरपंच माया शेंडगे यांनी केली, माजी उपसरपंच सचिन कदम यांनी राजीनामा दिल्याने निवडणूक घेण्यात आली.

यावेळी नवनिर्वाचित उपसरपंच ज्ञानदेव झिटे म्हणाले की, सर्व ग्रामपंचायत सदस्यांना विश्वासात घेऊन गावाचा विकास करण्यासाठी प्रयत्न करणार, यावेळी ग्रामसेवक गणेश बोराटे,माजी सरपंच युवराज शेंडगे,चेअरमन शिवाजी शेंडगे,माजी.चेअरमन महादेव झिटे,नवनाथ शेंडगे, ग्रामपंचायत सदस्य दत्ता काकडे,अनिल खाडे, उर्मिला कदम,सचिन शेंडगे,रूपाली खाडे,आशा शेंडगे,कालिदास कदम,औदुंबर कदम,माणिक काटकर,अंकुश शेंडगे,नानासो शेंडगे,तुषार शेंडगे, दिनेश शेंडगे,सुरेश कदम आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## नेपाळ बस दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबीयांना ५ लाखांची मदत

लोकनेता न्यूज नेटवर्क । जळगाव (वृत्तसंस्था)

नेपाळमध्ये झालेल्या बस अपघातात जळगाव जिल्ह्यातील २६ जणांचा मृत्यू झाला आहे. या अपघातात मृत व्यक्तींच्या कुटुंबीयांना राज्य सरकारकडून ५ लाखांची आर्थिक मदत केली जाणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे. जळगाव येथे पार पडलेल्या लखपती दीदी या कार्यक्रमात त्यांनी याबाबत घोषणा केली आहे. जळगाव येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लखपती दीदी या योजनेचे उद्घाटन करण्यात आले आहे.जळगाव जिल्ह्यातील वरणगाव, तळवेल तसेच या भागातील ८० भविकांचा समूह देवदर्शनासाठी गेले होते. नेपाळ येथे शुक्रवारी भाविकांच्या एका बसला भीषण अपघात झाला.

# आगामी विधानसभा निवडणूक आत्मविश्वासाने लढेल आणि जिंकेल- शंकर अण्णा धोंडगे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

कंधार तालुक्यातील स्वामी रामानंद तीर्थ विद्यालयात महाराष्ट्र राज्य समिती पक्षाच्या प्रमुख पदाधिकारी यांची बैठक संपन्न झाली.यावेळी महाराष्ट्र राज्य समिती पक्षाचे प्रमुख शंकर अण्णा धोंडगे यांनी आपल्या पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की नांदेड येथे होणाऱ्या राज्यस्तरीय शेतकरी अधिवेशनात राजकीय परिवर्तन घडविणारे ठरेल. महाराष्ट्रातील दोन्ही आघाडी नको असणाऱ्या सर्व मित्र पक्षांनी एकत्र येऊन राजकीय परिवर्तन घडवण्यासाठी महाराष्ट्र राज्य समिती (एम.आर.एस) पक्षाची स्थापना केली. यावेळी पुढे बोलताना म्हणाले की महाराष्ट्र राज्य समिती पक्ष महाराष्ट्रातील २८८ विधानसभा निवडणूक लढवणार आणि या अंतर्गत एक सक्षम पर्याय म्हणून उमेदवार (एम.आर.एस) च्या अंतर्गत देणार असल्याचे ते म्हणाले लोहा-कंधार मतदार संघातील महाराष्ट्र राज्य समिती (एम.आर.एस) पक्षाच्या प्रमुख पदाधिकारी बैठकीत






दि.४ सप्टेंबर रोजी नांदेडला होणारे राज्यस्तरीय अधिवेशन महाराष्ट्रातील आगामी विधानसभा निवडणुकीत राजकीय परिवर्तन घडविनारे ठरेल असा ठाम विश्वास महाराष्ट्र राज्य समिती पक्षाचे प्रमुख शेतकरी नेते माजी आमदार धोंडगे यांनी व्यक्त केला.

नांदेडला होणारे राज्यस्तरीय शेतकरी अधिवेशन हे महाराष्ट्र पातळीवर स्थापन झालेल्या परिवर्तन आघाडीच्या वतीने होत असुन महाराष्ट्र राज्य समिती, स्वाभिमानी शेतकरी संघटना, शेतकरी संघटनेचा स्वतंत्र भारत पक्ष, तसेच इतरही अनेक सामाजिक राजकीय संस्था परिवर्तन आघाडीत सामील झाल्या असुन अशा अनेक समविचारी पक्ष व संघटनाही आमच्या संपर्कात असल्याचे धोंडगे यांनी सांगितले या पंचवार्षिक काळात महाविकास व महायूती या दोन्ही आघाडयांची अलटून-पलटून सत्तेत आले. या कार्यकाळात राज्याच्या विकासाचे गाडे तर थांबलेच असुन,शेतकऱ्यांचे, बेरोजगाराचे,सामाजिक प्रश्न यांनी गंभीर केल्यामुळे महाराष्ट्रातील जनतेच्या मनात या दोन्ही आघाडयांच्या बाबतीत असंतोष असल्यामुळे राज्यात शेतकऱ्यांचे, कष्टकऱ्यांचे, बेरोजगारांचे व सामान्य जनतेचे, सामाजीक प्रश्न प्रामाणिक पणे सोडवण्यासाठी एक सक्षम व गुणवत्तेचा राजकीय पर्याय ही परिवर्तन आघाडी देईल असा विश्वासही या बैठकीत शंकर अण्णांनी विश्वास दिला.

शेगाव येथे परिवर्तन आघाडीचा पहिला मेळावा दि.२४ ऑगस्ट रोजी मोठ्या प्रमाणात यशस्वी झाला असुन दि.४ सप्टेंबर बुधवारी दुपारी १ वाजता नवा मोंढा नांदेडच्या मैदानावर होणाऱ्या राज्यस्तरीय शेतकरी अधिवेशनात राज्यभरातून किमान ५० हजार प्रतिनिधी हजर राहनार असुन या अधिवेशनाचे यजमान पद आपल्याकडे असल्यामुळे लोहा कंधार मतदार संघातील सर्व पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी आज पासुनच तन-मन धनाने त्याच्या प्रचार व प्रसार कार्याची सुरूवात करावी व हे अधिवेशन यशस्वी करावे असे अवाहन शंकर अण्णा धोंडगे यांनी केले. तसेच स्वतः मी लोहा कंधार विधानसभा मतदार संघातून माझी तयारी झालेली आहे, आणी मी विधानसभा निवडणूक आत्मविश्वासाने लढेन आणि जिंकेल असेही शंकर अण्णा धोंडगे म्हणाले. बैठकीच्या सुरुवातीलाच नांदेड लोकसभेचे दिवंगत खासदार वसंतराव चव्हाण यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करून पुढील कार्यक्रम सुरू करण्यात आला होता.यावेळीबैठकीत लोहा-कंधार मतदार संघातील शेकडो पदाधिकारी,कार्यकर्ते उपस्थित होते.

### धर्माबाद तालुक्यातील विविध मागण्या संदर्भामध्ये

# जिल्हाधिकारी अभिजीत राऊत साहेब यांच्या कडे नागनाथ माळगे यांची निवेदनाद्वारे मागणी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**धर्माबाद । साहेबराव दुगाने**

पंतप्रधान शेतकरी सन्मान योजना व मुख्यमंत्री नमो शेतकरी योजना धर्माबाद तालुक्यातील विविध मागण्या संदर्भामध्ये नांदेड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी अभिजित राऊत साहेब यांच्याकडे सदरच्या गोरगरीब शेतकऱ्याचा विचार करून व शासनाचा शेतकऱ्यांना लाभ मिळवून देण्यासाठी अंगठ्यामुळे ई.के.वाय सी.होत नाही अशा शेतकऱ्यांना तात्काळ पर्याय काढून शेतकऱ्यांना पंतप्रधान सन्मान योजनेचे व मुख्यमंत्री नमो शेतकरी योजनेचे हप्ते मिळवून देण्या करिता संबंधित तलाठी व मंडळ अधिकारी यांच्याकडून अहवाल मागून घेउन शेतकऱ्यांना न्याय मिळवून द्यावा वयोवृद्ध शेतकऱ्याच्या हाताचे ठसे येत नसल्यामुळे ई.के.वाय.सी. होत नाही. या सदरील शेतकऱ्यांना पंतप्रधान सन्मान योजना व मुख्यमंत्री नमो योजनेपासून वंचित आहेत



परंतु सदरची जाचक अटी म्हणजे ई.के वाय.सी.ची अट घातल्यामुळे शेतकऱ्याचे अंगठे येत नाही आधारला मोबाईल नंबर सुद्धा लिंक होत नसल्यामुळे वयोवृद्धांना शासनाच्या विविध योजनाचा लाभ मिळत नाही तरी योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी योग्य ती उपाययोजना करावे जिल्हाधिकारी अभिजित राऊत यांची भेट घेऊन धर्माबाद तालुक्यातील ६३ मयत शेतकऱ्यांचे महात्मा ज्योतिबा फुले कर्जमुक्तीमध्ये भारतीय स्टेट बँक ऑफ धर्माबाद या शाखेच्या कर्तव्यामध्ये कसूर केल्यामुळे मयत शेतकऱ्यांचे वारसदार वंचित राहिले आहेत असे सहाय्यक निबंध यांच्या कार्यालयाकडून बँकेने त्या साईडवर जाऊन कागदपत्रे अपलोड केले नाहीत पत्रामध्ये नमूद केले आहे व २०१९ व २०२० मध्ये वारसांनी संबंधित बँकेला आवश्यक ते सर्व कागदपत्राची पूर्तता केली होती. तरी संबंधित शेतकरी कर्जमुक्तीच्या लाभापासून वंचित राहिले आहेत तरी या योजनेची साईट चालू करून मयत शेतकऱ्यांचा महत्त्वाचा प्रश्न हा मार्गी लावून वारसांना न्याय मिळवून द्यावा अशी मागणी जिल्हाधिकारी अभिजित राऊत साहेब यांच्याकडे नागनाथ माळगे यांनी निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

# गौतम भाई मित्र मंडळ लोणारच्या वतीने धर्मवीर महाकाल कावडचे स्वागत



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार । विनायक कुटे**

लोणार शहरा मध्ये दरवर्षीप्रमाणे यंदाही लोणार नगरी मधील,धर्मवीर महाकाल कावड यात्रा मध्ये येणाऱ्या सर्व भाविक भक्तांचे लोणार वासियांनी स्वागत केले व ठिक ठिकाणी अल्प उपहारचे आयोजन केले होते तसेच दरवर्षीप्रमाणे याही वर्षी वर्ष चौथे डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक यां ठिकाणी सर्व भाविक भक्तांना चहा फराळाचे वाटप वंचित बहुजन आघाडी युवा तालुकाध्यक्ष व गौतम भाई गवई मित्र मंडळ यांच्या वतीने आयोजित करण्यात आले.

# वंजारी महासंघाकडून गुलाबराजा फुलमाळी पुरस्कृत

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पुणे । प्रतिनिधी**

वंजारी महासंघाचे दुसरे राज्यस्तरीय साहित्य संमेलन दिनांक २५ ऑगस्ट रोजी गंगा लॉन्स राष्ट्रसंत भगवानबाबा चौक निर्मल नगर अहमदनगर येथे नुकतेच उत्साहात संप्पन्न झाले.या संमेलनासाठी संमेलनाध्यक्ष म्हणून प्रा.डॉ. सांगिता घुगे तर उद्घाटक म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. गजानन सानप हे उपस्थित होते. वंजारी महासंघाचे संस्थापक अध्यक्ष विचारवंत गणेशजी खाडे,स्वागताध्यक्ष म्हणून आंतरराष्ट्रीय कुस्ती पटू राजकुमार आघाव तर सहस्वागताध्यक्ष रेणुका वराडे अनेक दिग्गज मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला.या संमेलनात दैनिक महाराष्ट्र दर्पणचे संपादक कवी, लेखक, गीतकार गुलाबराजा फुलमाळी यांना राष्ट्रसंत भगवान बाबा साहित्यरत्न पुरस्कार २०२४ प्रदान करण्यात आला.



गुलाबराजा फुलमाळी नेवासा तालुक्यातील पाथरवाले या खेडे गावातले असून कविते पासूनचा प्रवास आज युवाव्याख्याते तर थेट चित्रपटा कलावंत पर्यंत संघर्षमय प्रवास वाखाजण्याजोगा आहे.दर्पण प्रकाशन संस्था, दर्पण वृत्तपत्र सुरु करणे ,चित्रपटासाठी गीतलेखन कथा पटकथा लेखन ,प्रेरक व्याख्यानातुन समाज प्रबोधन,चित्रपटातही अभिनय अशी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. राज्यभर त्यांचे कार्यक्रम होत असतात. गरजूना मदत करनारी संस्था म्हणून ओळखल्या जाणाऱ्या राजे श्री शिवशाही समूह या संस्थेचे संस्थापक सचिव म्हणून काम पाहतात. अनेक पुरस्काकाराचे मानकरी असणाऱ्या फुलमाळी यांची या सर्व कामाची दखल घेऊन वंजारी महासंघ महाराष्ट्र यांच्या मार्फत ' राष्ट्रसंत भगवान बाबा साहित्यरत्न पुरस्कार २०२४ ' लेखक, कवी, संपादक, व्याख्यातें गुलाबराजा फुलमाळी यांना नुकताच प्रदान करण्यात आला. या पुरस्कारामुळे फुलमाळी यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# परळी ते बीड बसवाहक महिला कर्मचाऱ्यांची प्रवाशांसोबत उद्धटपणा,बेशिस्त वर्तन

### बसमधील प्रवाशानी दोन वेळा तिकीट का? प्रश्न विचारले म्हणून चालू प्रवासातील बस २० मिनिटे रस्त्यावर ठेवली थांबवून!

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**परळी । मिलिंद वाघमारे**

परळी ते बीड लालपरी प्रवसात करत असताना प्रवाशासोबत घडलेला हा धक्कादायक , प्रकार आहे, पांगरी ता.परळी येथील पर्यायी नळकांडी पुल वाणनदीला आलेल्या पुरानी चार दिवसा पूर्वीच वाहून गेला आहे. महामंडळाने गेल्या चार दिवसापासून या महामार्गावर बस सेवा वळवली आहे,परंतु रोड निश्चित न केल्याने याचा नाहाक त्रास बस प्रवास करणाऱ्या प्रवाशांना होत आहे.परळी ते सोनपेठ, सोनपेठ ते शिरसाळा त्यानंतर बीड थेट बीडचे तिकीट मिळत नाही. तात्काळ रूट निश्चित करून थेट परळी ते बीड जाणाऱ्या प्रवासात तिकीट देण्याची व्यवस्था करावी. यामुळे प्रवास करणाऱ्या ग्राहकांना अतिरिक्त भाड्याचा त्रास करावे लागत आहे. यावर आजच आपण निर्णय घ्यावा अन्यथा आपली व आपल्या उद्धट वाहक व चालक यांची तक्रार आपल्यावरील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे करणार आहे. परळी बस स्थानकाचे डेपो मॅनेजर यांना



अनेक वेळा बस मधून फोन केला त्यांनी तो फोन उचलला नाही. परळी ते बीड बस मध्ये प्रवास करत करताना हा सर्व प्रकार घडला . सदरील परळी डेपो ची बसचा क्रमांक चक-२० इङ-१८८२

या बसचे चालक व वाहक यांच्यावर कारवाई करण्यात यावी थेट तिकिटाची मागणी केल्यानंतर, व्यवस्थित बोलण्याऐवजी आपण वरिष्ठांशी बोला, व हुज्जत घालत बस मध्येच रस्त्यावर १५ ते २० मिनिटं थांबवली, पाठीमागून येणारी देखील बस अधिकारी आहेत म्हणून थांबून घेतली, त्या बसमधील वाहक व चालक हे आमच्या बसमध्ये येऊन आम्हाला शांत राहण्याची सूचना करत होते. या उलट आपण परळीच्या डेपो मॅनेजर यांना बोला असे सांगण्यात आले व नंबर उपलब्ध करून दिला नाही. चर्चा अंति हा आपला नंबर देण्यात आला. बस मध्ये घडत असलेला प्रकार मी पत्रकार असल्याने सर्व मोबाईल मध्ये रेकॉर्ड करत होतो, वाहक महिला (कंडक्टरणे) पत्रकाराच्या हातातील व्हिडिओ रेकॉर्डिंग करत असलेला मोबाईल झडप मारून हिसकाटून घेतला, तो बराच वेळ दिला नाही. या वाहक महिलेने उडवा उडवी उत्तरे दिली. सर्व बसमधील प्रवासाला वेटीस धरले. एका पत्रकाराला व्हिडिओ करण्यापासून व वार्तांकन करण्यापासून रोखले,अशा हे बेशिस्त व उद्धटपन्नाची वागणूक देणाऱ्या वाहक व चालकावर योग्य ती कारवाई करा. अन्यथा आपल्या कार्यालया समोर आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

### शालेय विद्यार्थ्यांच्या मुलभूत सुविधांसाठी मुख्यमंत्री लाडकी विद्यार्थीनी योजना अंमलात आणा

# जिल्हापरिषदेच्या १४२० शाळा विजेवीणा तर ३५० शाळांमध्ये स्वच्छता गृहांचा अभाव; सखी सावित्री समिती कागदावरच-डॉ.गणेश ढवळे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे सध्या महाराष्ट्र भर मोठ्या प्रमाणावर मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना अंमलात आणण्याचा गाजावाजा करत असुन त्याचवेळी दुसरीकडे शालेय विद्यार्थ्यांना पायाभूत शिक्षणासाठी आवश्यक शाळेमध्ये वीज, स्वच्छतागृहे, मोडकळीस आलेल्या ईमारती आदिंसाठी प्रयत्न करताना दिसुन येत नाही.बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या १४२० शाळा विजेविना जिल्हा परिषदेच्या २१६४ पैकी ३१७ शाळांमध्ये स्वच्छतागृहांचा अभाव तर जिल्हा परिषदेच्या ३५० शाळेच्या५९२ वर्गखोल्या धोकादायक असुन पायाभूत शिक्षणासाठी मुलभूत सुविधांसाठी उपाययोजना करण्यात यावी तर विध्यार्थींनीसाठीची सखी सावित्री समिती कागदावरच आढळून येत आहे यावरील प्रमुख मागण्यांसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.२६. सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्ष्यवेधी मुख्यमंत्री लाडकी बहिण प्रमाणेच मुख्यमंत्री लाडकी विद्यार्थीनी योजना अंमलात आणावी यासाठी धरणे आंदोलन करण्यात येऊन जिल्हाधिकारी बीड , मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांना निवेदन देण्यात आले.यावेळी आंदोलनात शेख युनुस,सुदाम तांदळे, शेख मुबीन,शिवशर्मा शेलार,शेख मुस्ताक, बाळासाहेब मोरे, प्रदेशाध्यक्ष शिवशक्ती भिमशक्ती विचार मंच, भाई विष्णुपंत घोलप,बप्पासाहेब पवार आदि सहभागी होते.

बदलापूर येथील विद्यार्थ्यांनी वरील अत्याचार प्रकरणानंतर शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला असुन शाळांमध्ये सीसीटीव्ही लावण्याचा निर्णय शिक्षण विभागाने बंधनकारक केला आहे.मात्र बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या तब्बल २४७८ शाळांपैकी १०५८ शाळांत वीज जोडणी असल्याची नोंद आहे.शाळांच्या वीजजोडणीचे अनामत शुल्क, वीज देयकाची रक्कम भरण्यासाठी पुर्वी सर्व शिक्षा अभियानातुन निधी मिळत असे मात्र हा निधी आता बंद झाला आहे.त्यामुळे वीज देयके थकल्याने तब्बल १४२० शाळांमध्ये वीजपुरवठाच नाही. या शाळांमधील प्रोजेक्टर, ध्वनीक्षेप, डिजिटल शिक्षणासाठी आवश्यक वीज जोडणी वरील उपकरणे धुळखात पडुन आहेत.त्यामुळे या शाळांना तातडीने वीज पुरवठा करण्यात यावा.बीड जिल्ह्यात जिल्हा परिषद, खाजगी अनुदानित,विना अनुदानित अशा एकुण ३३४२ शाळा आहेत.यापैकी ३३५ ठिकाणी स्वच्छतागृहांची सोय नाही.तर जिल्हा परिषदेच्या २१६४ शाळांपैकी ३१७ शाळांमध्ये स्वच्छतागृहे नसल्याची स्थिती आहे.त्यामुळे मुलभुत तसेच भौतिक सुविधांबाबत शिक्षण विभागाच्या विविध उपक्रमात केंद्र प्रमुख, गटशिक्षणाधिकारी यांच्या कडुन नियमित तपासणी करून तातडीने सुविधांसाठी उपाययोजना करण्यात यावी.

बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या एकुण २४७४ शाळा आहेत यात २४१५ शाळा प्राथमिक तर ५९ शाळा माध्यमिक आहेत.शाळांची दुरावस्था झाली असुन ३४९ शाळांमधील ५९२ वर्गखोल्या मोडकळीस आलेल्या आहेत तर ४६८ शाळांमधील ८५६ वर्गखोल्यांची दुरुस्ती आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना जीव धोक्यात घालून ज्ञानार्जन करावे लागत आहे. लोकप्रतिनिधी व प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष असुन गांभीर्याने याकडे पाहण्याची गरज असुन तातडीने मोडकळीस आलेल्या शाळांच्या दुरुस्तीसाठी तसेच पुनर्बांधणी साठी निधी उपलब्ध करून देण्यात यावा.

शाळांमध्ये मुलींच्या मानसिकतेसह इतर बाबी आणि त्यांना शिक्षणासाठी पुरक आधार ठराव्यात म्हणून सखी सावित्री समिती गठीत करण्याचे शासनाने दोन वर्षापुर्वीच आदेश दिलेले आहेत.हि समिती सर्व शाळांमध्ये असल्याचे सांगण्यात येते मात्र शाळा स्तरावर दरमहा १,केंद्रावर २ महिन्याला आणि गटशिक्षणाधिकारी पातळीवर ३ महिन्याला बैठक अपेक्षित असताना त्या होत नसुन समित्या केवळ कागदोपत्रीच असुन संबंधित प्रकरणात गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.

## सीना नदी प्रदूषणाच्या विळख्यात फेसयुक्त पाण्याने संपूर्ण नदीपात्र झाकलं खुंटेफळ

# वाटेफळ येथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात प्रशासनाने दखल घ्यावी ग्रामस्थांची मागणी


**सहाय्यक सचिव महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण महामंडळ यांना जनहितार्थ ईमेल करून सामाजिक कार्यकर्ते बाबु देवकर यांनी केला विनंतीचा ईमेल**

## किती बोलायचं,कुणाला बोलायचं आणि का बोलायचं ? व्यवस्था मेली आहे आणि आम्ही जगत आहोत-सामाजिक तथा माहिती अधिकार कार्यकर्ते यांची खंत

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**








सीना नदीमध्ये अनेक नाल्यांचे थेट पाणी सोडले जात असल्यामुळे सीना नदी मुख्यत खुंटेफळ व वाटेफळ या ठिकाणी नदी अत्यंत प्रदूषित झाली आहे दूषित नदीमुळे अनेकांचे आरोग्य धोक्यात आले असून नागरिकांच्या जीवाशी खेळ सुरू आहे असे असताना प्रशासन बघ्याची भूमिका घेत आहे त्यामुळे नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे.सिना नदीमध्ये अनेक मासे ;खेकडे ;जलचर सामावून घेणाऱ्या नदीमध्ये दिवसेंदिवस प्रदूषणात वाढ होत आहे त्यामुळे या नदीच्या पाण्यामुळे अनेक जलचारांना जलसमाधी मिळत आहे सीना नदी प्रदूषण मुक्त होण्यासाठी अनेक नागरिक टाहो फोडत आहेत पण प्रशासकीय उदासीनता तसेच कारखान्यांमधून निघणारी केमिकल युक्त पाणी रोखण्यासाठी प्रशासन डोळे झाक करत असल्याने अहमदनगर नजीक सीना नदीचा श्वास गुदमरला आहे. एन एन गुरव साहेब सहाय्यक सचिव महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण महामंडळ यांना ईमेल केला आहे..साहेब....किती बोलायचं,कुणाला बोलायचं आणि का बोलायचं ? व्यवस्था मेली आहे आणि आम्ही जगत आहोत..सामाजिक तथा माहिती अधिकार कार्यकर्ते यांची खंतसीना नदी ही भीमा नदीची उपनदी असून ती महाराष्ट्र राज्याच्या अहमदनगर जिल्ह्यात शहराच्या उत्तरेस ही नदी उगम पावते.त्यापैकी एक अहमदनगर शहराच्या पश्चिमेस जामगाव जवळ तर दुसरे दोन प्रवाह शहराच्या ईशान्य जेऊर आणि पिंपळगाव उजनी जवळ उगम पावतात.सुरुवातीच्या टप्प्यात अहमदनगर शहरापर्यंत ही नदी दक्षिणा वाहिनी आहे येथून पुढे ती आरोग्य वाहिनी बनते या टप्प्यात या नदीमुळे अहमदनगर व बीड या जिल्ह्याची सुमारे ५५ किलोमीटर लांबीची नैसर्गिक सरहद्द आहे.खुंटेफळ व वाटेफळ ही गावे नदीपात्रात चिकटून असलेली गावे आहेत.सीना नदीत रसायन मिश्रित पाणी नदीत मिसळते त्यामुळे प्रदूषित झाल्याने नदीला फेस येतो येथील काही नाले अधिक क्षमतेने वाहतात त्यामुळे दूषित पाणी ही गंभीर आजारांना निमंत्रण देते.

प्रशासकीय अधिकाऱ्यांची उदासीनता खुटेफळ व वाटेफळ या ग्रामपंचायत या नदीच्या काठावर महत्त्वाच्या अशा स्थानिक स्वराज्य संस्था आहेत.नदीचे प्रदूषण रोखण्यासाठी प्रदूषण नियंत्रण मंडळ आहे पण सीना नदीचे प्रदूषण कोणाच्याही नजरेस पडत नाही.प्रशासकीय यंत्रणेचे डोळेझाक भविष्याबाबत कसले चिंता नसलेले कारखानदार सिना नदीचा आकांत लक्षात घेत नाहीत ही मोठी शोकांतिका आहे. सीना नदी हे काही गावांची तहान भागवत शेत शिवार फुलवत वाहते नदी शहराजवळ येतात अनेक गटारी ;नाले ;नदी थेट मिसळतात त्यामुळे नदीचा रंग बदलतो.निर्मळ पाण्याला नाल्याचे स्वरूप येते.काही प्रमाणात मोकळ्या वाहणाऱ्या सीना नदीला फेसाचे स्वरूप येते जलपर्णी दिसू लागते व नगर जवळून खुंटेफळ व वाटेफळ या ठिकाणी जाताच नदीला अक्षरशा फेस येतो व हा अनेक दिवस तसाच राहतो.

> सीना नदीत सांडपाणी सोडल्यामुळे अनेक प्रकारचे रोग निर्माण झाले आहेत.तेच जल तीर्थ म्हणून प्राशन करता येत नाही.याकडे शासनाने लक्ष दिले पाहिजे आणि ग्रामस्थांच्या आरोग्य धोक्यात आले असून सीना नदी प्रदूषण मुक्त करणे गरजेचे आहे .
> **श्री.बाबु देवकर माहिती तथा सामाजिक कार्यकर्ते**

## शिवशंकराच्या जयघोषाने दुमदुमला पिंपरी दुमाला परिसर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**रांजणगाव गणपती । प्रतिनिधी**



रांजणगाव गणपती जवळील निसर्गाच्या कुशीत वसलेले एक छोटेसे व टुमदार असे पिंपरी दुमाला (जि.पुणे) गाव फळबागांसाठी प्रसिद्ध आहे .पांडवकालीन शिव मंदिरासाठी प्रसिद्ध असलेल्या देवभूमी श्री क्षेत्र पिंपरी दुमाला येथील श्रावणी सोमवार यात्रेनिमित्त रांजणगाव गणपती पंचक्रोशीतील अनेक शाळांनी परिसर सहली आयोजित केल्या होत्या. गावाचा संपूर्ण परिसर शेकडो विद्यार्थ्यांमुळे गजबजुन गेला होता.

यावर्षी झालेल्या भरपूर पावसामुळे येथील डोंगररांगावरील निसर्ग सौंदर्य अधिकच बहरले आहे. दरवर्षी श्रावण महिन्यात येथे हजारो शिवभक्त दर्शनासाठी येतात. विशेषतः परिसरातील प्राथमिक व माध्यमिक शाळा श्रावणी सोमवार यात्रेचे निमित्त साधून येथे सहली घेऊन येतात.

श्री सोमेश्वर व श्री रामेश्वर मंदिरांमधील शिवलिंगाचे दर्शन करून हे विद्यार्थी संपूर्ण दिवस येथे रमून जातात.

याप्रसंगी श्री सोमेश्वर देवस्थान ट्रस्टच्या माध्यमातून गावातील व परिसरातील दानशूर व्यक्ती दर्शनासाठी आलेल्या सर्व विद्यार्थी व भाविकांना अन्नदानाचे आयोजन करतात.

मंदिर परिसरातील विशाल वटवृक्षाच्या पारंब्यावर झोके घेत व यात्रेतील खेळण्यांचा आनंद लुटत सहलीचा दिवस कधी संपला हे विद्यार्थ्यांच्याही लक्षात आले नाही. मनात रेंगाळणाऱ्या सुंदर आठवणी सोबत घेऊन विद्यार्थी आपापल्या गावी रवाना झाले.

विद्यार्थ्यांच्या सहलीसाठी उत्तम नियोजन व भोजन व्यवस्था केल्याबद्दल देवस्थानचे पदाधिकारी सुनील सोनवणे,शेखर पाटेकर, कैलास पिंगळे,अभिषेक शेळके,श्रीकांत सोनवणे,अरुण कळसकर,कैलास बडदे यांचे केंद्रप्रमुख श्री यशवंत रणदिवे व मुख्याध्यापक राहुल चातुर यांनी श्री सोमेश्वर देवस्थान ट्रस्ट पिंपरी दुमाला यांचे आभार व्यक्त केले.

## दिग्रस (कराळे) येथे आ.मुटकुळे यांच्या हस्ते वर्गखोल्याचे भूमिपूजन संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**



हिंगोली जिल्ह्यातील दिग्रस कराळे येथे आज हिंगोली विधानसभेचे कार्यसम्राट आमदार तानाजीराव मुटकुळे यांच्या हस्ते वर्गखोल्याचे भूमिपूजन पार पडले, यावेळी सरपंच संभाजी कराळे संतोष टेकाळे माणिक लोंढे साहेबराव पाटील बळीराम पाटील अनिल हलगे सुभाषराव कराळे गजानन कराळे गजानन ,दत्तराव, अशोक काळे, दादाराव महाराज, नामदेवराव महाराज, पंकज कराळे, गुत्तेदार पी पी मुळे, शिवाजी कराळे, इंजिनीयर साखळे, संतोष कराळे, आकाश कऱ्हाळे, व अधिक गावातील प्रतिष्ठित नागरिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते,

## सेनगाव तहसील कार्यालयावर शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी मोटरसायकल मोर्चा धडकणार



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**

हिंगोली जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांच्या वतीने आज दिनांक २६ ऑगस्ट रोजी माननीय तहसीलदार सेनगाव यांना लेखी स्वरूपाचे निवेदन दिले आहे की दिनांक २८ रोज बुधवार रोजी शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी मोटर सायकल मोर्चाचे आयोजन करण्यात आले असून यामध्ये शेतकऱ्याच्या विविध मागण्या संदर्भात या मोटरसायकल मोर्चाचे आयोजन करण्यात आले आज दिनांक २६ ऑगस्ट रोजी तहसीलदार यांना लेखी निवेदन देण्यात आले या निवेदनामध्ये येलदरी धरणाचा डावा कालवा, शेतकऱ्यांना कर्जमाफी, शेतकऱ्यांना सरसकट दुष्काळी देण्यात यावी व शेतकऱ्यांना सरसकट पीक विमा देण्यात यावा अशा विविध मागण्या संदर्भात बुधवार रोजी शेतकऱ्यांनी मोटरसायकल मोर्चाचे आयोजन केले आहे , तरी या मोटरसायकली मध्ये हजारो शेतकरी बांधवांनी सहभागी व्हावे असे आवाहन शेतकरी नेते मारोती गीते व सामाजिक कार्यकर्ते वसंतराव अवचार यांनी केले आहे.

## लोकप्रतिनिधी व बेजबाबदार न.पा.मुख्याधिकारी यांच्यावर कार्यवाही करा-डॉ.गोपाल बछिरे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार सरोवर । विनायक कुटे**



मेहकर लोकप्रतिनिधी व बेजबाबदार न.पा. मुख्याधिकारी यांच्यावर कारवाई करण्याची मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हा संघटक डॉ. गोपाल बछिरे यांनी उपविभागीय अधिकारी यांच्याकडे केली आहे.

मेहकर डीपी रोडवरील पथदिव्याचे खांब एका लोकप्रतिनिधीच्या आनंद उत्सव कार्यक्रमासाठी तेथून उपटून तेथे कार्यक्रम घेण्यात आला त्यास महिना होत आहे परंतु अद्याप येतील पथदिव्याचे खांब बसवले गेले नाही ही जबाबदारी कोणाची खांब काढनाऱ्याची का मूगगिळुन बसलेल्या शासन प्रशासनाची असा प्रश्न उपस्थित झाला आहे गजानन नगर, बालाजी नगर, समता नगर, संताजी नगर, चनखोरे कॉलनी, म्हाडा कॉलनी, शिवाजीनगर या परिसरातील महिला भगिनी सायंकाळी अंधाराचे साम्राज्य असलेल्या या डिपी रोडवर शतपावली करतात त्याच रोडवरून शेकडो लहान मुली ट्युशनला अंधारातूनच ये, जा करतात आज घडीला देशात प्रत्येक पंधरा मिनिटात एक बलात्कार होत आहे गत दहा वर्षात महिलांवरील अत्याचार ७५ टक्के वाढलेले आहे एवढी गंभीर बाब असताना मेहकर चे लोकप्रतिनिधी आपला आनंद उत्सव साजरा करण्यासाठी डीपी रोडवरील खांब उपटून तेथे शामियाने लावून उत्सव साजरा करतात व एक महिना होऊन सुद्धा ते पथदिव्याचे खांब अजूनही पूर्वस्थितीत लावलेले नाही या अंधाराचा फायदा घेऊन जर त्या ठिकाणी एखादी छेडछाड, बलात्कार सारखा गंभीर गुन्हा घडला तर यास जबाबदार कोण?

आपण जबाबदार अधिकारी म्हणून सदरिल परिस्थितीचे गंभीर्य लक्षात घेऊन उत्सव साजरा करणारे लोकप्रतिनिधी व बेजबाबदार नगरपालिका मुख्याधिकारी यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी अन्यथा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आपल्या स्टाईलने आंदोलन छेडेल याची गांभीर्याने नोंद घ्यवी असा इशारा शासन प्रशासनास, विभागीय अधिकारी यांच्या माध्यमातून देण्यात आला व त्याची प्रत राज्यपाल, मुख्यमंत्री, गृहमंत्री, जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक यांना पाठवण्यात आली.

# कड्यात बदलापूर आणि कोलकत्ता घटनेतील आरोपींना फाशी देण्यासाठी निषेध मोर्चा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । राजू म्हस्के**

बदलापूर आणि कोलकत्ता अत्याचार घटनेतील आरोपींना फाशी देण्यासाठी कडा येथील सर्व शाळांमधील तीन हजार मुलींनी सामाजिक कार्यकर्ते अनिल तात्या ढोबळे यांच्या नेतृत्वाखाली निषेध रॅली काढली या रॅलीमध्ये सरकारच्या विरोधामध्ये प्रचंड घोषणाबाजी करण्यात आली. तसेच आरोपींना तात्काळ फाशी देण्याची मागणी करण्यात आली.गेल्या काही दिवसापूर्वी बदलापूर आणि कोलकाता येथील घटना या माणुसकीला काळीमा फासणाऱ्या घडल्या असून लहान लहान मुलींवर अत्याचार झाले आहेत.आम्ही सहन तरी किती दिवस करणार याच्या निषेधार्थ कडा येथील श्रीराम विद्यालय, मोतीलाल कोठारी विद्यालय, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,भगिनी निवेदिता शाळा, लॉर्ड महावीर इंग्लिश स्कूल,पी एम ज्युनिअर कॉलेज, डी.फार्मसीच्या तब्बल तीन हजार विद्यार्थिनींनी शहरातून निषेध रॅली काढून फाशी द्या, फाशी द्या आरोपींना फाशी द्या,महिलांचे संरक्षण करा, मुलींचे संरक्षण करा, अशा घोषणा देऊन संपूर्ण गावातून निषेध रॅली काढल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याजवळ रॅलीचा शेवट करण्यात आला. या ठिकाणी अनेक मुलींनी भाषणे केले. या भाषणातून सरकारवर प्रचंड असा रोष दिसून येत होता. सरकार फक्त बेटी बचाव बेटी पढाव असा नारा देत आहे. मग महिला व मुलींची सुरक्षा कोण करणार. मुली आज रस्त्याने निर्भयपणे फिरू शकत नाहीत. तर आम्हाला शस्त्र परवाना द्या अशी मागणी राजनंदिनी ढोबळे, प्राची पोकळे ज्ञानेश्वरी अनारसे केली. यावेळी कड्याचे सपोनी विजय नरवाडे यांनी कायद्याबद्दल माहिती सांगितली तसेच जर कुठे छेडछाडीचे प्रकार झाले तर १००, ११२, १०२ या नंबर वर कॉल करण्याचे आवाहन केले तसेच मुलींनीही धाडस दाखवून तक्रारी देण्याची आवाहन केले.



दैनिक लोकनेता



# शिवमहापुराण कथेला बाहेर गावाहून आलेल्या भाविकांना कृपाछत्र उपक्रमाअंतर्गत छत्र्यांचे वाटप

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**

आंतरराष्ट्रीय कथाकार पंडित प्रदीपजी मिश्रा यांची शिव महापुराण कथा लाखो भाविकांच्या उपस्थितीत नांदेड येथे सुरू असून पावसामुळे भक्तांची गैरसोय होऊ नये म्हणून कृपाछत्र उपक्रमांतर्गत संयोजक धर्मभूषण ड. दिलीप ठाकूर यांच्या पुढाकारातून रविवारी रात्री पेंडॉलमध्ये थांबलेल्या बाहेर गावच्या भक्तांना कथेचे संयोजक डॉ.शिवराज नांदेडकर व पिंकू पोकर्णा यांच्या हस्ते छत्र्या वाटप करण्यात आल्या.तसेच कथास्थळी दररोज भाऊचा डबा वाटप करण्यात येत आहे



शिवभक्तांना छत्री वाटप करताना दिलीप ठाकूर, शिवप्रसाद राठी, सुरेश लोट, सुरेश शर्मा,श्रीकांत पाचपोर,चंचल नागलिया, शिवा लोट,ओम तापडिया,शिवचरण लोट, गणेशसिंह परमार,श्रीकांत सावंत,कार्तिक यादव,श्री पांपटवार हे उपस्थित होते.कृपाछत्र उपक्रमाच्या पाचव्या वर्षी सफाई कामगार, वृद्धाश्रम, अनाथाश्रम, वृत्तपत्र विक्रेते, रस्त्यावरील बेघर यांना २०२४ छत्र्या वाटप करण्यात येणार आहेत.आता पर्यंत ३१८ छत्र्यांसाठी देणगीदार मिळाले आहेत.त्यामध्ये धर्मभूषण ड.दिलीप ठाकूर यांच्यातर्फे ५०, गंजेवार याच्या तर्फे ४८ तर हॉटेल मिडलँड गोकुळनगर नांदेड व स्नेहलता जायसवाल हैदराबाद यांच्यातर्फे प्रत्येकी ३२ छत्र्या मिळाल्या आहेत. प्रत्येकी १६ छत्र्या देणाऱ्या मध्ये प्रमिला महेश भालके, डॉ. गोविंद भाकरे,एक राम भक्त,अशोक विठ्ठलराव पडगीलवार, रुहिका रूपेश मुत्तेपवार, सुरेश शंकरराव पळशीकर,आनंद सिताराम



साताळे, ला. शिवाजीराव पाटील,मोहित व रेणुका सोनी, निर्मला द्वारकादास अग्रवाल यांचा समावेश आहे.

मुसळधार पाऊस पडल्यामुळे बाहेरगावच्या भक्त्यांची गैरसोय होऊ नये म्हणून दररोज वरण-भात ,भाजी पोळी असलेला भाऊचा डबा वाटप करण्यात येत आहे. अन्नदानासाठी दानशूर नागरिकांनी भरभरून प्रतिसाद दिला आहे. त्यामध्ये प्रसिद्ध उद्योजक नवलकिशोर गुप्ता व उदय गंदेवार,गणेश मालवदकर वसमत यांनी प्रत्येकी शंभर डब्याची प्रत्येकी नोंदणी केली आहे.रूपाली दलाल वसमत अंशी तर सौ.रूपाली साठ डबे देणार आहेत. प्रत्येकी ५० डब्यासाठी नवीन नोंदणी करणाऱ्यांमध्ये सिध्दि स्वंय सहाय्यता महिला बचत गट भाग्यनगर ,मराठवाडा वैश्य शिक्षक संघटना,प्रतीक पतंगे,प्राचार्य प्रभाकर उदगीरे,भगवानदास आसवा उमरी,सारस पंतुलवार देगलूर,संतोष निल्लावार,भीम कोडगीरे,सुधाकरराव जबडे देगलुर,गजानन टाक ,राम देबडवार,प्रदीप कुलकर्णी,श्री इंटरप्राईजेस मालेगाव रोड ,बालाजी वर्मा,अरुण मामीडवार हदगाव,व्यंकट रविकार,मुकुंद जाधव व सौ. उज्वला करडीले,संतोष गड्डम लोहा,रितेश अग्रवाल वसमत,महेश राजकुमार,अवधूत लाभसेटवार,रेखा देशपांडे,चंचल नागलिया,अर्जुन गुंडाळे ,लक्ष्मीकांत मोटरवार,सावित्री शिंदे,लक्ष्मीकांत बच्चेवार,,श्रीकांत गोगटे,विलास मोमाईवार, शंकर कापकर ,स्वप्निल चव्हाण,विनायक तुप्तेवार हिमायतनगर यांचा समावेश आहे. याशिवाय संगीता इंगोले व सविता शिंदे,रत्नाकर जोशी हे तीस तर डबे आशा नागभूषण दुर्गम,लक्ष्मीकांता तानुरकर धर्माबाद,सुदर्शन भोकरे हे पंचवीस ,डॉ.संजय तेलंग उदगीर ममता लाटकर,संध्या देशमुख हे प्रत्येकी वीस डबे देणार आहेत.दरवर्षी प्रमाणे या वर्षी जितके वर्ष तितके लाभार्थी या तत्वानुसार २०२४ छत्र्या वितरणाचे उदिष्ट भाजपा नांदेड महानगर व लायन्स क्लब नांदेड सेंट्रल तर्फे ठेवण्यात आले आहे.छत्र्या होलसेल मार्केट मधून खरेदी करण्यात येत असून नाव छपाईच्या शुल्कासह किमान १६ छत्र्यासाठी रू.२५०० देणगी देणाऱ्यांची नावे छत्र्यांवर रबर प्रिंटिंग द्वारे छापण्यात येणार आहेत. ज्यांनी जितक्या छत्र्या दिल्या तितक्या छत्र्यांचे शिवभक्तांना वाटप त्याच देणगीदारांच्या हस्तेच करण्यात येणार आहे. देणगीदारांची माहिती सोशल मीडिया च्या मार्फत पन्नास हजार लोकापर्यंत प्रसिद्ध केली जाणार आहे.तरी दानशूर नागरिकांनी भरभरून प्रतिसाद द्यावा असे आवाहन संयोजक दिलीप ठाकूर यांनी केले आहे.

## दीक्षांत समारोह कार्यक्रमां मध्ये सोपान पगारे सन्मानित





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडल,मुंबई वार्षिक दीक्षांत समारोह कार्यक्रम विष्णुदास भावे नाट्यगृह,वाशी नवी मुंबई येथे दि २४ ऑगस्ट रोजी पार पडला.या कार्यक्रमामध्ये प्रमुख अतिथी प्रा.डॉ.जोगेंद्रसिंह बिसेन, कुलगुरू - यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,नाशिक यांच्या हस्ते संगीत क्षेत्रातील विविध मान्यवरांना पदवी व पुरस्कार देण्यात आल.यामध्ये वाहिरा गावचे पत्रकार सोपान पगारे यांना तबला विशारद परीक्षेमध्ये प्रथम श्रेणी मिळवल्याबद्दल सन्मानित करण्यात आले.या सन्मानाबद्दल ग्रामस्थ व विविध क्षेत्रातील मान्यवरांनी सोपान पगारे यांचे अभिनंदन व कौतुक केले .



**आष्टी : राज्याचे माजी महसूल राज्यमंत्री लोकनेते सुरेश आण्णा धस यांची कामानिमित्त भेट घेताना किरण शिनगीरे,रावसाहेब मुटकुळे,संतोष मुटकुळे,साहेबराव मुटकुळे, भूषण श्रीखंडे,तोडकर,रेवन माळी व आदी दिसत आहे.**

# प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे छत्रपती संभाजीनगर येथे आगमन व स्वागत

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

लखपती दीदी संमेलनात देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे सहभागी होऊन देशभरातील स्वयसहाय्यता गटांना २५०० कोटी फिरता निधीचे वाटप व ५००० कोटीचे बँक अर्थसाह्य करण्यात आले .

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी महाराष्ट्र दौऱ्यावर आहेत जळगाव येथे योजनेच्या शुभारंभ निमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे सकाळी छत्रपती संभाजी नगर विमानतळावर आगमन झाले . प्रशासनाच्या वतीने त्यांची स्वागत करण्यात आले. यावेळी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे पालकमंत्री अब्दुल सत्तार , गृहनिर्माण मंत्री अतुल सावे , खासदार संदिपान भुमरे , आमदार संजय शिरसाट , आमदार प्रशांत बंब , आमदार विजयसिंह राजपूत , आमदार पंकजा मुंडे, खासदार डॉ. भागवत कराड , माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे तसेच जिल्हाधिकारी दिलीप स्वामी , पोलीस आयुक्त प्रवीण पवार , जिल्हा पोलीस अधीक्षक विनय कुमार राठोड , यांची यावेळी उपस्थिती होती त्यानंतर देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हेलिकॉप्टरने दीनदयाळू अंत्योदय योजना-राष्ट्रीय ग्रामीण अजीविका मिशन अंतर्गत स्वयसहाय्यता समूह सदस्य देशभरातील स्वयंसहाय्यता गटांना

रु. २५०० कोटी फिरता निधीचे वाटप व रु.५००० कोटीचे बँक अर्थसहाय्य लखपती दीदी या संमेलनात जळगावकडे नियोजित कार्यक्रमासाठी रवाना झाले .



## गागलेगाव येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती साजरी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली । गौतम गावंडे**

बिलोली तालुक्यातील गागलेगाव येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची २५ रोजी १०४ वी जयंती साजरी करण्यात आली यावेळी सकाळी ९:३०वा. रामतीर्थ पोलीस स्टेशनचे बिट जमादार शेख यांच्या हस्ते लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पुजन करुन ध्वजारोहन करण्यात आले.यानंतर जि.प.प्रा.शाळा गागलेगाव येथील मुख्याध्यापक चितावार,तलाठी



गंगाधर जाधव,पत्रकार इंद्रजीत डुमणे,हानमंत जाधव,सरपंच प्रतिनिधी आनंदा जिंके,पोलीस पाटील गोपाळ गायकवाड आदी वक्त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.तसेच वयाच्या ४९ व्या वर्षी अतीशय हलाकीच्या परीस्तीतीचा सामना करत पुणे येथे जावुन वाचमेनची नोकरी करत अभ्यास करुन गंगाधर जाधव हे तलाटी पदी नियुक्त झाल्या बद्दल गावकर्यांच्या वतीने गंगाधर जाधव व त्यांच्या पत्नी जयश्री गंगाधर जाधव या दोघांचा सत्कार करण्यात आला.त्यानंतर दुसर्या सत्रात दुपारी ४ वा. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या तैलचित्राची भव्य अशी मिरवणुक गावातील मुख्य रस्त्याने काढण्यात आली यानंतर तिसर्या सत्रात रात्री ठिक ९ वा.शाहीर बापुराव गाडेकर यांचा प्रबोधनात्मक गीत गायनांचा कार्यक्रम झाला.लोकशाहिर अण्णाभाऊ साठे यांची जयंती जयंती मंडळाचे अध्यक्ष राजेश जाधव,अणिल जाधव नागेश जाधव यांच्या नेतृत्वाखाली अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली .या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन बालाजी गोरे यांनी केले.

# खडकवासला-फुरसुंगी बोगदा प्रकल्पाच्या कामाला राज्य मंत्रिमंडळाची प्रशासकीय मान्यता-आ.राहुल कुल

## आमदार राहुल कुल यांच्या पाठपुराव्याला मोठे यश

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड । बबनराव धायतोंडे**

खडकवासला प्रकल्पाच्या नविन मुठा उजवा कालव्याचा कि.मी.१ ते ३४ लांबीचा भाग पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतून जात असल्याने पुणे शहराची सर्वांगिण बाजूने होणारी वाढ, झोपडपट्टी, अतिक्रमणे व पर्यायाने होणारे जलप्रदुषण,जलनाश यामुळे कालव्याची होत असलेली हानी व त्यामुळे कालव्याच्या वहनक्षमतेत झालेली घट टाळण्यासाठी नविन मुठा उजवा कालव्याच्या कि. मी.१ ते ३४ मधील लांबीसाठी २७ किमी पर्यायी खडकवासला ते फुरसुंगी पर्यंत बोगदा करावा अशी मागणी दौंड तालुक्याचे आमदार राहुल कुल यांनी उपमुख्यमंत्री तथा जलसंपदा मंत्री देवेंद्र फडणवीस यांचेकडे निवेदनाद्वारे केली होती. तसेच विधानसभा सभागृहात देखील वेळोवेळी प्रश्न,लक्षवेधी चर्चा, अर्धातास चर्चा अशा आयुधाच्या माध्यमातून चर्चा उपस्थित केली होती.

याबाबत शासनस्तरावर अनेक बैठका घेण्यात आल्या होत्या तसेच दि. १९ ऑगस्ट २०२४ रोजी घेण्यात आलेल्या बैठकीत सदर प्रस्ताव मंत्रिमंडळ बैठकीत सादर करण्याचे आश्वासन उपमुख्यमंत्री तथा जलसंपदा मंत्री देवेंद्र फडणवीसयांनी दिले होते.आमदार कुल यांच्या या पाठपुराव्याला मोठे यश आले असून,या प्रकल्पास राज्य मंत्रिमंडळाने आज मान्यता दिली आहे.

या पर्यायी खडकवासला - फुरसुंगी बोगदा प्रकल्पामुळे सुमारे ३ टि.एम.सी. पाणी बचत होऊन दौंड,हवेली,इंदापूर व बारामती तालुक्यातील सिंचनासाठी तसेच बिगर सिंचनासाठी पाणी उपलब्ध करून देता येणार आहे.तसेच सिंचनासाठी उपलब्ध होणाऱ्या पाण्यातून सिंचनापासून वंचित राहणारे ३४७१ हे.इतके क्षेत्र पाण्याखाली येणार आहे.या पार्श्वभूमीवर



खडकवासला प्रकल्पाअंतर्गतच्या नविन मुठा उजवा कालव्याचा कि.मी. १ ते ३४ ऐवजी खडकवासला - फुरसुंगी बोगदा प्रकल्पाच्या जलसंपदा विभाग व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०२२ - २३ च्या दरसूचीवर आधारित रू.२१९०.४७ कोटी इतक्या किंमतीच्या प्रस्तावास आज मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे.

तसेच जुना मुठा उजवा कालवा (बेबी कॅनॉल) कि. मी. ४३ (कुंजीरवाडी - लोणीकाळभोर, ता. हवेली) ते कि. मी. १०९ (भागवतवस्ती पाटस, ता. दौंड) एकूण ६७ कि. मी. लांबीच्या अस्तरीकरण व मजबूतीकरण या कामासाठी सुमारे १८८.७५ कोटी रुपयांच्या निधीस देखील उपमुख्यमंत्री तथा जलसंपदा मंत्री देवेंद्र फडणवीस मंजुरी दिली असून त्याची निविदा प्रकिया देखील पूर्ण झाली आहे. लवकरच कामाला देखील सुरुवात होणार आहे.

दौंड तालुक्यातील जानाई शिरसाई उपसा सिंचन योजनेच्या कालव्यांना बंदिस्त नलिका वितरण प्रणालीमध्ये रूपांतरित करणे व अस्तरीकरण करण्याच्या कामासाठी प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीची (डङ्ढ-उ) ची मान्यता घेऊन तातडीने निविदा प्रक्रिया करावी आशा सूचना जलसंपदा मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या असून त्याला देखील लवकरच मान्यता मिळेल असे आमदार कुल यांनी सांगितले तसेच मुळशीचे पाणी पूर्वमुखी वळविण्याबाबत स्थापन करण्यात आलेल्या सुर्वे समितीचा अहवाल स्वीकारण्याबाबत देखील राज्यसरकार सकारत्मक असून, याबाबत देखील चांगला निर्णय महायुती सरकार घेईल असे देखील आमदार राहुल कुल यांनी यावेळी सांगितले आहे.

या सर्व निर्णयाबाबत आमदार राहुल कुल राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे तसेच यासाठी प्रशासकीय पातळीवर काम केलेल्या सर्व अधिकाऱ्यांचे आभार मानले आहे.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४
This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904